***श्री. राम नाईक***

**संक्षिप्त परिचय**

**(1 जून 2011)**

1. श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात श्री.राम नाईक हे 13 ऑक्टोबर 1999 ते 13 मे 2004 या कालावधीत पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री म्हणून कॅबिनेट मंत्री होते. 1963 मध्ये पेट्रोलियम व नैसर्गिक वायू खात्यासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन झाले. तेव्हांपासून सर्वाधिक काळ श्री.नाईक पेट्रोलियम मंत्री होते. त्यापूर्वीच्या केंद्र सरकारमध्ये रेल्वे (स्वतंत्र प्रभार - 7 ऑगस्ट 1999 पासून), गृह, नियोजन व कार्यक्रम अंमलबजावणी आणि संसदीय कामकाज या खात्यांचे राज्यमंत्रीपद (13 मार्च 1998 ते 13 ऑक्टोबर 1999) श्री.नाईक यांनी भूषविले. एकावेळी इतकी महत्वाची खाती सांभाळणे विशेष मानले जाते. सध्या भारतीय जनता पार्टीच्या खासदार - आमदार यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच गुणसंवर्धनासाठी स्थापन केलेल्या 'खासदार - आमदार विकास प्रकोष्ठ' चे ते राष्ट्रीय संयोजक आहेत.
2. श्री.नाईक यांनी पेट्रोलियम व नैसर्गिक वायू खात्याचे मंत्री म्हणून ऑक्टोबर 1999 मध्ये पदभार स्वीकारला. त्यावेळी देशातील एक कोटी दहा लाख ग्राहक घरगुती गॅससाठी प्रतिक्षा यादीवर होते. या सर्वांसह एकूण 3 कोटी 50 लाख नव्या गॅस जोडण्या देऊन श्री.नाईक यांनी प्रतिक्षा यादी संपविली. याउलट त्याआधीच्या 40 वर्षात एकूण 3.37 कोटी गॅस जोडण्या दिल्या गेल्या होत्या. याखेरीज शहरी भागातील कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी आणि डोंगरी भागासाठी श्री.नाईक यांनी 5 किलोचा सिलेंडरही उपयोगात आणला. मागेल त्याला गॅसची नवी जोडणी मिळू लागली. परंतु मे 2004 मध्ये सत्तेवर आलेल्या कॉंग्रेस सरकारच्या कारकिर्दीत नवी गॅस सिलेंडर जोडणी मिळेनाशी झाली आहे.तसेच विद्यमान ग्राहकांना संपलेल्या सिलिंडरऐवजी दुसरा सिलिंडर चार-चार आठवडे मिळेनासा झाला आहे. कृत्रिम टंचाईमुळे भ्रष्टाचारही वाढला आहे. त्यामुळे श्री.नाईक यांच्या या कामाची महती आणखीच सिध्द होते. त्याचप्रमाणे कच्च्या तेलाचे परावलंबित्व दूर व्हावे म्हणून त्यांनी विविध योजना आखून त्यांची अंमलबजावणी सुरु केली. त्यातील महत्वाचा एक निर्णय म्हणजे ऊसाच्या मळीपासून इथेनॉल निर्माण करुन त्याचे पेट्रोलमध्ये 5 टक्के मिश्रण करणे. तसेच भविष्यात देशभर 10 टक्के मिश्रण करण्याइतकी इथेनॉल निर्मिती करणे. कारगिल लढाईतील हुतात्म्यांच्या वीरपत्नींना/जवळच्या नातलगांना तेल कंपन्यांच्या मार्फत पेट्रोल पंप आणि गॅस वितरण एजन्सी देण्याची अभिनव योजना त्यांनीच मंजूर केली. संसदेवरील हल्ल्याच्यावेळी आपल्या प्राणांची आहुती देणा-या सुरक्षा कर्मचा-यांच्या कुटुंबियांनाही पेट्रोलपंप दिले गेले.
3. 'रेल्वे प्रवाशांचे मित्र' म्हणूनच राम नाईक यांना मुंबईकर ओळखतात. 1964 मध्ये गोरेगाव रेल्वे प्रवासी संघाची स्थापना करुन श्री.नाईक यांनी रेल्वे समस्या सोडविण्यास सुरुवात केली. ते रेल्वे राज्यमंत्री असतानाच 'मुंबई रेल्वे विकास महामंडळ' स्थापन झाले. विविध प्रकल्प सुरु झाले. 65 लाख मुंबई उपनगरी प्रवाशांच्या दृष्टीने उपनगरी रेल्वेच्या कार्यक्षेत्राचा डहाणूपर्यंत विस्तार, 12 डब्यांच्या गाड्या, संगणीकृत आरक्षण केंद्र, बोरीवली-विरार चौपदरी तर कुर्ला-कल्याण-सहापदरी रेल्वे मार्ग, अशा अनेक सुधारणांना सुरुवात झाली. रेल्वे फलाट आणि प्रवासी गाड्यामध्ये विडी - सिगरेट विक्रीस बंदी घालण्याचा ऐतिहासिक निर्णय श्री. नाईक यांच्याच कारकिर्दीत झाला. प्रवाशांकडून नावे मागवून नव्या गाड्यांचे नामकरण करण्यास त्यांनीच सुरुवात केली. जगातली पहिली 'महिला विशेष गाडी' सुरु करण्यात श्री.नाईक यांचा सिंहाचा वाटा आहे. 2005, 2007 आणि 2011 या वर्षात उपनगरी प्रवाश्यांच्या परिषदा घेऊन त्यांच्या अडचणी प्रभावीपणे सरकार समोर मांडल्या तर 11 जुलै 2006 च्या उपनगरी गाड्यात झालेल्या बॉम्बस्फोटामुळे प्रभावित झालेल्या कुटुंबियांना मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. 10 डिसेंबर 2007 रोजी जागतिक मानवाधिकार दिनाच्या निमित्ताने बोरीवली ते विरार या पश्चिम रेल्वेवरील अतिगर्दीच्या विभागातील प्रवाशांचा दर पाच मिनिटाला विरार गाडी पाहिजे या मागणीसाठी अभूतपूर्व बहिष्काराचा यशस्वी कार्यक्रम झाला. त्या लढ्याचेही नेतृत्व त्यांनी केले.
4. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून सलग पाच वेळा निवडून येण्याचा विक्रम श्री.राम नाईक यांनी नोंदविला आहे. तत्पूर्वी, याच लोकसभा क्षेत्रातील बोरीवली विधानसभा मतदार संघातून सलग तीन वेळा ते विजयी झाले होते. 1999 मधील लोकसभेच्या निवडणुकीत 5,17,941 मते मिळविणारे श्री.नाईक महाराष्ट्रात सर्वाधिक मते मिळण्याच्या गौरवाचे मानकरी ठरले. मुंबईतून सलग आठवेळा निवडून येण्याचा विक्रम करणारे ते पहिले लोकप्रतिनिधी ठरले. जनप्रतिनिधी असताना उत्तरदायित्त्वाच्या तत्वाला अनुसरुन ते मतदारांना 2009 पर्यंत दरवर्षी कामाचा अहवाल सादर करीत असत. निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही असे अहवाल सादर करणारे ते एकमेव माजी जनप्रतिनिधी आहेत.

5. लोकसभेत प्रवेश केल्यानंतर अल्पावधीतच मुरब्बी संसदपटू अशी प्रतिमा निर्माण झालेल्या श्री.नाईक यांनी 1995-96 मध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणा-या लोकलेखा समितीचे अध्यक्षपद भूषविले. त्या पूर्वीच्या तीन लोकसभांमध्ये ते भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रतोद होते. नानाविध संसदीय आयुधांचा कौशल्याने वापर करण्याच्या गुणामुळे संसदेतील चर्चेत छाप पाडणा-या श्री.नाईक यांनी रोखे घोटाळ्यावरील संयुक्त संसदीय समिती, महिला अधिकारप्रदान समिती, रेल्वे कन्व्हेंशन समिती अशा अनेक महत्वाच्या समित्यांच्या कामात योगदान दिले आहे. लोकसभा अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठीच्या पीठासिन अधिका-यांच्या तालिकेतही त्यांचा समावेश होता.

6. संसदेत 'वंदे मातरम्' गाण्याची प्रथा श्री राम नाईक यांच्या आग्रहामुळेच सुरु झाली. इंग्रजांच्या काळात झालेले 'बॉम्बे' व हिंदीतील 'बंबई' चे पुन्हा मूळ मराठी स्वरुपात 'मुंबई' करण्यासाठी त्यांनी सरकारला भाग पाडले. मतदार संघाच्या विकास कार्यासाठी प्रत्येक खासदारास दरवर्षी एक कोटी रुपयांचा निधी मिळण्याची मूळ कल्पना श्री राम नाईक यांचीच आहे. ते नियोजन आणि कार्यक्रम अंमलबजावणी खात्याचे राज्यमंत्री असतांना ही रक्कम दोन कोटी रुपये करण्यात आली. शिशु-आहाराच्या जाहिरातींवर बंदी आणून स्तनपानास प्रोत्साहन देण्यासाठी विरोधी पक्षात असताना त्यांनी संसदेत अशासकीय विधेयक मांडले. सरकारने त्याचा स्वीकार करुन नंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले.

7. श्री राम नाईक यांचा जन्म सांगली येथे 16 एप्रिल 1934 रोजी झाला, तर शालेय शिक्षण सांगली जिल्ह्यात आटपाडी येथील भवानी विद्यालयात झाले. वाणिज्य तसेच कायदा शाखेचे पदवीधर असलेल्या श्री राम नाईक यांनी मुंबईतील अकाऊंटन्ट जनरलच्या कार्यालयातील लिपिक पदापासून नोकरीच्या पर्वाची सुरुवात केली. अल्पावधीत खाजगी क्षेत्रातील ख्यातनाम उद्योगात कंपनी सेक्रेटरी म्हणून ते स्थिरावले. काही काळ व्यवस्थापन सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहीले. श्री. राम नाईक बालपणापासूनच राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे स्वंयसेवक आहेत. संघाचे द्वितीय वर्षाचे प्रशिक्षण त्यानीं घेतलेले असून पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण घेताना वैदिकाश्रम शाखेचे आणि नंतर मुंबई मध्ये आझाद मैदान आणि सिध्दार्थनगर, गोरेगाव येथील शाखांचे मुख्य शिक्षक म्हणून त्यानीं कार्य केले.

8. 1969 मध्ये मुंबईत जनसंघाचे पूर्णवेळ संघटन सचिव म्हणून काम करण्यासाठी श्री राम नाईक यांनी उत्तम नोकरीवर पाणी सोडले. 1977 पर्यंत त्यांनी त्या पदावर यशस्वीपणे काम केले. भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर पक्षाच्या मुंबई विभागाचे अध्यक्षपद श्री नाईक यांनी तीन वेळा भूषविले. सध्या ते भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे विशेष निमंत्रित सदस्य आहेत. तसेच भाजपा 'खासदार - आमदार विकास प्रकोष्ठ' चे राष्ट्रीय संयोजक आहेत.

9. तारापूर येथील अणु ऊर्जा प्रकल्प टप्पा 3 व 4 मुळे अक्करपट्टी व पोफरण येथील विस्थापितांच्या पुनर्वसनाचा लढा मुंबई उच्च न्यायालयात श्री.राम नाईक लढवित आहेत. विस्थापितांना न्याय मिळतो आहे. या संदर्भात 'गाथा संघर्षाची' हे पुस्तकही श्री.नाईक यांनी लिहिले आहे, त्याचा इंग्रजीतही अनुवाद झाला आहे. कुष्ठपीडित रुग्णांना सामाजिक प्रतिष्ठा लाभावी तसेच त्यांचे योग्य पुनर्वसन व्हावे म्हणून 5 डिसेंबर 2007 रोजी त्यांच्या पुढाकाराने राज्यसभेला विनंती अर्ज सादर करण्यात आला. राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीने देशभरात दौरे करुन आपला अहवाल 24 ऑक्टोबर 2008 रोजी सादर केला असून त्यावर भारत सरकारने सहा महिन्यात कारवाई करावयास हवी; परंतु ती अद्याप झालेली नाही.

10. श्री राम नाईक यांना 1994 मध्ये कर्करोग झाला. परंतु श्री नाईक यांनी त्यावरही निग्रहाने मात केली. त्यानंतर गेली 17 वर्षे ते पूर्वीच्याच उत्साहाने व क्षमतेने काम करीत आहेत. जागरुकपणा, बारीकसारीक तपशीलाची नोंद घेणारी तीक्ष्ण नजर ही बलस्थाने आणि पारदर्शी प्रामाणिकपणा, कार्यकर्त्यांचे जाळे, लोकसंग्रह तसेच उल्लेखनीय कार्यक्षमता या गुणांमुळे श्री राम नाईक यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व सर्वत्र आदरणीय ठरले आहे.

11. श्री. राम नाईक यांना 75 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या श्रीमती जयवंतीबेन महेता यांच्या अध्यक्षतेखाली 'राम नाईक अमृत महोत्सव समिती' स्थापन होऊन त्यांचा सर्वपक्षीय जाहिर अभिनंदन समारोह 28 मार्च 2010 रोजी मुंबईत बोरीवली येथे संपन्न झाला. त्या समारंभात सर्वश्री लाल कृष्ण आडवाणी, उद्धव ठाकरे, नितीन गडकरी, गोपीनाथ मुंडे, मधुकर पिचड, रामदास आठवले, गोपाळ शेट्टी आणि श्रीमती श्रद्धा जाधव, महापौर यांची भाषणे झाली. तसेच 'कर्मयोद्धा - राम नाईक' हा गौरव ग्रंथ प्रकाशित झाला. सदर ग्रंथ www.ramnaik.com या वेबसाइट वर उपलब्ध आहे.

----------